# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प) ता.जि.ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्र. २८१९ २८ २८/ २८१९ ३० २८ फॅक्स क्र. २८१९७६३६
ई मेल : १. rchmbmc@rediffmail.com. 2) rchmbmc@yahoo.com

## वैद्यकीय आरोग्य विभाग


बेटी बचाओ
save the girl child

जा.क्र मनपा/वैद्यकीय/ ४४७ /२०२१-२२ दि.०४/०५/२०२१

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय : जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाकरिता कोविड-१९ अंतर्गत वैद्यकीय संवर्गातील पदांची ठोक मानधनावर तात्पुत्या स्वरुपात भरणेकरीता जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत जाहिरात जोडण्यात आली आहे.

(स्वाक्षरी)

for (डॉ. प्रमोद पडवळ)
प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

I 2nd Hdd data backup D Drive VAIBHAV All A4 Letter Jahirat prsidhi karne baabt

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे :- ४०१ १०१.

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/ ४४५ /२०२१-२२ दि. ०४/०५/ २०२१

## // जाहिरात //

**विषय :-कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर करार पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता खालील पदांकरीता जाहिरात प्रसिध्द करुन थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview) इच्छुक व पात्र उमेदवारांची निवड करणेकामी अर्ज करण्यासाठी कळविण्यात येत आहेत. खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह दि.०८/०५/२०२१ रोजी सकाळी. १०.०० ते दुपारी ०२.०० वा. या कालावधीत वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, मिरा- भाईंदर महानगरपालिका, (स्व.इंदिरा गांधी भवन), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | मासिक ठोक एकत्रित मानधन | एकूण पदांची संख्या (*) |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (MBBS) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची MBMS पदवी आवश्यक व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक.. | रु. ८०,०००/- | १० |
| २ | वैद्यकीय अधिकारी (आयुष) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए.एम.एस, बी.एच.एम.एस., बी.यु.एम.एस व तत्सम अर्हता पदवी आवश्यक व महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी आवश्यक.. | रु. ६०,०००/- | ६० |
| ३ | प्रसविका | दहावी/बारावी परीक्षा उत्तीर्ण आणि मान्याता प्राप्त संस्थेतील ऑक्झीलेरी मिडवाईफ नर्सिंग कोर्स पूर्ण, महाराष्ट्र नर्सिंग नोंदणी आवश्यक. | रु. २५,०००/- | ४०० |
| ४ | बायोमेडिकल इंजिनियर | बायोमेडिकल अभियांत्रीकी क्षेत्रातील पदवी व संबधित क्षेत्रात काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव आवश्यक. | रु. ४०,०००/- | ०३ |

(* पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे.)

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवाराची निवड ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असून सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास किंवा रुग्ण संख्या कमी झाल्यास सदरील नेमणूक तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

२) नियुक्तीच्या कालावधीत नियुक्तीच्या ठिकाणी सोपविलेले काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

३) सदर नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर देण्यात येणाऱ्या आल्यामुळे संबंधितास महानगरपालिकेच्या /शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचा अधिकार व हक्क् नसेल.

४) इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता/ अर्हता (इयत्ता दहावी व त्यापुढील) तसेच अनुभव प्रमाणपत्र यांच्या अर्जासोबत छायांकित प्रती सादर कराव्यात.

**५) इतर अटी व शर्ती :-**

१. सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमून्यात (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या अर्जाचा नमूना) अर्ज करणे बंधनकारक राहील.

२. वयोमर्यादा ३८ वर्षांपर्यंत.

३. अर्जासोबत १. पदवी प्रमाणपत्र २. शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ३. शाळा सोडल्याचा दाखला ४. संबधित कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्यकत.

४. अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र आवश्यक.

५. संबंधित पदासाठी तत्सम कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्रक जोडणे आवश्यक आहे.

६. कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी कोविड केअर सेंटर (CCC), सर्मपित कोविड आरोग्य केंद्र (DCHC), सर्मपित कोविड रुग्णालय (DCH), लसीकरण केंद्र या ठिकाणी कर्मचारी यांची आवश्यकतेनुसार प्राधान्य क्रमाने नियुक्ती करण्यात येईल.

७. खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे एकूण १०० गुणांची गुणतालिका तयार करण्यांत येणार आहे.

| पदाचे नांव ............................................................ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | शैक्षणिक अर्हता (अंतिम वर्षाचे गुण) (८० गुण) | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता (Add Qualification) (१० गुण) | अनुभव (०५ गुण) शासकीय/निमशासकीय – रुग्णालय, आरोग्य केंद्र येथील कामाचा अनुभव | अनुभव (०५ गुण) शासकीय/निमशासकीय-कोविड-DCH/DCHC/CCC व इतर येथील कामाचा अनुभव | एकुण गुण (१०० गुण) |
| | | | | | | |

८. पदासमोर नमूद मानधन हे एकत्रित मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

९. अनुभवाच्या गुणाकरीता शासकीय/निमशासकीय – रुग्णालय, आरोग्य केंद्र येथे २ वर्षपेक्षा कमी कामाचा अनुभव असल्यास ० गुण, दोन वर्ष अनुभव असल्यास ०३ गुण आणि पुढे प्रत्येक वर्षासाठी एक याप्रमाणे जास्तीत जास्त ५ गुण व शासकीय/निमशासकीय कोविड-DCHC/DCH/CCC/इतर मध्ये ३ महिन्यांपेक्षा कमी कामाचा अनुभव असल्यास ० गुण, ०६ महिने कामाचा अनुभव असल्यास ०३ गुण, ०९ महिने कामाचा अनुभव असल्यास ०४ गुण व १२ महिने कामाचा अनुभव असल्यास ०५ गुण (कोविड कालावधीत काम केले असल्यास जास्तीत जास्त ५ गुण) असे अनुभवा करीता गुणदान असेल. पदव्युत्तर पदविका असल्यासक ०५ गुण व पदव्युत्तर पदवी असल्यास अतिरीक्त शैक्षणिक अर्हतेचे (Add Qualification) १० गुण देण्यांत येतील.

१०. गुणवत्ता यादी तयार झाल्यानंतर ती https://mbmc.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल.

११. छाननी नंतर योग्य उमेदवारांनी निवड करण्याचे अंतिम निर्णय मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

१२. सदरची नेमणूक तात्पुरती असल्याने उमेदवारांची निवड स्थानिक परिस्थिती व गरजेनुरुप करण्यात येणार आहे. याबाबत कोणतीही विचारणा दूरध्वनीवर करण्यात येऊ नये.

१३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१४. सदर रिक्त पदांची संख्या कमी-जास्त होऊ शकते याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर संख्यांमध्ये कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१५. पुर्ननियुक्तीबाबत शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१६. सदर उमेदवारांना महानगरपालिका सेवेत हक्क सांगता येणार नाही.

१७. भरती प्रक्रियेदरम्यान सर्व अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

**(संभाजी वाघमारे)**
उप-आयुक्त (वैद्यकीय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

## अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- ...................................................... पदांचा सांकेतिक क्र. ................. )

प्रति,
**मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

फोटो

(१) संपूर्ण नांव : मराठी — इंग्रजी (कॅपिटल लेटर)

१. **आडनांव** : ................................ ................................

२. **स्वत:चे नांव** : ................................ ................................

३. **वडिलांचे/ पतीचे नांव** : ................................ ................................

(२) **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता** : ..................................................................
**(पिन कोडसहित)** ..................................................................
..................................................................
..................................................................

**संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक** : ..................................................................

(३) **अ) जन्मतारीख** :

| तारीख | | महिना | | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**ब) मुलाखतीच्या दिनांक रोजीचे वय** ..........................**वर्ष**..........................**महिने**............**दिवस**

(४) **राष्ट्रीयत्व** : **भारतीय / अभारतीय**

(५) **शैक्षणिक अर्हता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

(६) **अनुभव:**

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| (७) | अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १) | शाळा सोडल्याचा दाखला | २) | गुणपत्रिका व पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र | ३) | कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र |

**ठिकाण** :-
**दिनांक** :-

**अर्जदाराची सही/-**